**ठळक बातम्या**

- भगवान गौतम बुद्धांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार देशाच्या विकासाचा मार्ग अभूतपूर्व आणि सकारात्मक बदल घडवणारा असेल असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- महाविकास आघाडीचं जागावाटप आज पूर्ण होण्याची शक्यता
- हरियाणामध्ये नायब सिंग सैनी सरकारचा शपथविधी
- आसाममधल्या अवैध स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्याशी संबंधित, नागरिकत्व कायद्याच्या कलम ‘6 अ’ ची घटनात्मक वैधता सर्वोच्च न्यायालयाकडून कायम
- खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचे ठोस पुरावे नसल्याची कॅनडाच्या प्रधानमंत्र्यांची कबुली

  **आणि**
- न्यूझीलँडविरुद्धच्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतीय संघाची हाराकिरी, पहिल्या डावात ४६ धावात भारताचा संपूर्ण संघ तंबूत

**<><><><><>**

भगवान गौतम बुद्धांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार देशाच्या विकासाचा मार्ग अभूतपूर्व आणि सकारात्मक बदल घडवणारा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय अभिधम्म दिवसानिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

भाषा, साहित्य, कला आणि आध्यात्मिकता हे सांस्कृतिक आधारस्तंभ देशाला वेगळी ओळख देतात, असंही ते म्हणाले. जगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात

पुढे जाताना, देशाची संस्कृती आणि मूल्यांचा अभिमान बाळगण्याचं आवाहन त्यांनी युवकांना केलं.

पाली भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळं भगवान बुद्धांच्या वारशा प्रती आदर व्यक्त केल्याचं त्यांनी सांगितलं. मूळ भारतीय असणाऱ्या ६०० पुरातन कलाकृती आणि अवशेष भारतात परत आणल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

महाविकास आघाडीचं जागावाटप आज किंवा उद्या जाहीर होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत २१६ जागांवर सहमती झाली आहे, उरलेल्या जागांवर आजच्या बैठकीत सहमती होईल, असं विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. काँग्रेसच्या ८४ जागांवरच्या उमेदवारांची छाननी झाली आहे. रविवारी केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीनंतर या ८४ किंवा काँग्रेसच्या सर्व जागांवरचे उमेदवार जाहीर होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली. समाजवादी पक्षाला महाविकास आघाडी काही जागा देणार आहे, असंही ते म्हणाले. राज्याच्या ८ विभागात महाविकास आघाडीच्या किमान ३ सभा घेण्याची तयारी असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नायबसिंह सैनी यांनी सलग दुसऱ्यांदा शपथ घेतली. त्यांच्यासोबत इतर आमदार मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. भारतीय जनता पक्षाला हरियाणा विधानसभा निवडणुकीत तिसऱ्यांदा विजय मिळाला आहे. सैनी यांच्या शपथविधीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित आहेत. पंचकुलामधल्या शालीमार मैदानावर हा शपथविधी सोहळा होत आहे.

या शपथविधानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार असणाऱ्या राज्यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची परिषद आज चंडीगडमध्ये होणार

आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या परिषदेचं अध्यक्षपद भूषवणार आहेत. राष्ट्रीय विकासाशी संबंधित मुद्यांवर परिषदेत चर्चा होणार आहे.

<><><><><>

सर्वोच्च न्यायालयानं आज नागरिकत्व कायदा, 1955 च्या कलम 6A ची घटनात्मक वैधता कायम ठेवली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या घटनापीठासमोर कलम 6A मधल्या तरतुदींना आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी सुरु होती. कायद्याचं 6A हे कलम आसाम करार लागू करण्यासाठी समाविष्ट करण्यात आलं होतं, तसंच 2019 साली आसाममधल्या राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी साठी ते आधारभूत मानलं गेलं होतं.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये न्यायमूर्ती सूर्यकांत, एम.एम. सुंदरेश, जेबी परडीवाला आणि मनोज मिश्रा, या पाच न्यायाधीशांच्या पीठानं, दोन्ही बाजूंचा तोंडी युक्तिवाद ऐकल्यानंतर आपला निर्णय राखून ठेवला होता.

आज झालेल्या सुनावणी नंतर या तरतुदीची घटनात्मक वैधता बहुमतानं कायम ठेवली, तर नागरिकत्व कायद्याचं कलम 6A संभाव्य परिणामासह रद्द करण्याचा न्यायमूर्ती पार्डीवाला यांचा निर्णय अल्पमतात ठरला.

<><><><><>

मलेशियाच्या अल्ट्रा इन्फोर्समेंट काँक्रिट तंत्रज्ञानाचा वापर करून सरकार पूल आणि मेट्रोच्या बांधकामाचा खर्च २५ टक्क्याने कमी करण्यासाठी काम करत असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी आज दिली. नीती आयोगातर्फे नवी दिल्ली इथे आयोजित आंतरराष्ट्रीय मिथेनॉल परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. भारताकडे बायोडिझेल आणि पर्यायी इंधन निर्यात करण्याची मोठी क्षमता असून भारताचं ऑटोमोबाईल उद्योगविश्व हे जगातलं तिसरं सर्वात मोठं उद्योगविश्व असल्याचंही गडकरी म्हणाले. आजपासून सुरू होणाऱ्या या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय मिथेनॉल परिषदेचा उद्देश उत्पादन

आणि संबंधित तांत्रिक विकासाशी संबंधित प्रकल्प, संशोधन तसंच विकास कार्यक्रमांच्या प्रगतीवर प्रकाश टाकणं असा आहे.

<><><><><>

अचूक आणि दर्जेदार माहिती श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्याची महत्त्वाची जबाबदारी प्रसारकांवर आहे, असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी आज केलं. नवी दिल्लीत सुरू असलेल्या इंडियन मोबाइल काँग्रेसमध्ये बदलते कल आणि तंत्रज्ञान या विषयावर ते बोलत होते. नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

केंद्र सरकारनं नुकतंच २३४ शहरातल्या ७३० नव्या खासगी रेडिओ केंद्रांना परवानगी दिल्याची माहिती त्यांनी दिली. प्रसारण क्षेत्रातली नियामकीय भूमिका बदलण्याची आणि नवनवीन तंत्रज्ञानाच्या पुढे राहण्याची गरज माहिती प्रसारण सचिव संजय जाजू यांनी व्यक्त केली. भविष्यातल्या प्रसारण क्षेत्रासाठीची तंत्रज्ञान आणि नियामकांची भूमिका यावर दूरसंचार नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष अनिल कुमार लाहोटी यांनी भूमिका मांडली.

<><><><><>

खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा हात होता हे आरोप करताना कॅनडाकडे कुठलेही ठोस पुरावे नव्हते. गुप्तचरांनी दिलेल्या माहितीच्या आधारे हे आरोप केल्याची कबुली कॅनडाचे प्रधानमंत्री जस्टीन ट्रुडू यांनी त्यांच्या देशातल्या चौकशी समितीसमोर दिल्याचं वृत्त आहे. यामुळं भारताची भूमिका स्पष्ट होते. भारत आणि भारताचे राजनैतिक अधिकारी यांच्यावर लावलेल्या आरोपांच्या समर्थनार्थ एकही पुरावा कॅनडानं दिला नसल्याचा पुनरुच्चार भारतानं केला. कॅनडाचे प्रधानमंत्री जस्टीन ट्रुडू यांच्यामुळेच दोन्ही देशातले संबंध खराब झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले.

<><><><><>

काझीरंगा राष्ट्रीय उद्यान फुलपाखरांच्या सर्वाधिक प्रजाती असलेलं देशातलं दुसरं सर्वात मोठं उद्यान ठरलं आहे. या उद्यानात फुलपाखरांच्या ४४६ पेक्षा जास्त प्रजाती आढळून आल्या आहेत. अरुणाचल प्रदेशातलं नमदाफा राष्ट्रीय उद्यान फुलपाखरांच्यासर्वाधिक प्रजातींसह देशात  पहिल्या स्थानावर आहे. काझीरंगा इथले युवा शास्त्रज्ञ मॉन्सून ज्योती गोगोई यांनी दीर्घकाळ घेतलेल्या नोंदी आणि निरीक्षणानंतर काझीरंगानं हा विक्रम नोंदवला आहे.

<><><><>

न्यूझीलंड विरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाचा पहिला डाव अवघ्या ४६ धावात आटोपला. भारताची ही देशातली सर्वात कमी आणि एकूण तिसऱ्या क्रमांकाची किमान धावसंख्या आहे. बेंगळुरूमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेला भारतीय संघ खेळपट्टीवर टिकाव धरुच शकला नाही. विराट कोहलीसह भारताचे एकूण ५ खेळाडू शून्यावर बाद झाले.  रिषभ पंतनं २० आणि यशस्वी जयस्वालनं १३ धावा केल्या. मॅट हेन्रीनं १५ धावात ५ गडी बाद केले. विल्यम ओरूक यानं १२ धावात ४ भारतीय खेळाडूंना तंबूत परत पाठवलं.  या कसोटीला हा दुसरा दिवस आहे. पावसामुळं काल पहिल्या दिवशी खेळ होऊ शकला नव्हता.

जागतिक कसोटी क्रमवारी भारत सध्या सर्वोच्च स्थानावर असून न्यूझीलंड सहाव्या स्थानी आहे. यापूर्वी बांग्लादेशासोबत खेळलेली मालिका भारतानं २-० अशी जिंकली होती. तर न्यूझीलंडनं श्रीलंकेविरोधातली मालिका ०-२ अशी गमावली आहे.

<><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम आजपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज

संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या Youtube वरुन हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. या कार्यक्रमात आज जळगाव जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या जागतिक ISSF नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत आज भारताच्या अनंतजीत सिंग याने स्कीट फायनल शॉटगन स्पर्धेत कास्यपदक पटकावलं. तर मैराज खान याला सहाव्या स्थानावर समाधान मानावं लागलं. तत्पूर्वी आज महिलांच्या स्कीट फायनलमध्ये गनेमत सेखॉन सहाव्या स्थानापर्यंतच पोहोचू शकली. कालच्या पात्रता फेरीत सेखॉननं 125 पैकी 122 लक्ष्य वेधून राष्ट्रीय विक्रम नोंदवला. आज होणाऱ्या इतर महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये विवान कपूर हा खेळाडू दुपारी 2 वाजता पुरुषांच्या ट्रॅप फायनलमध्ये खेळेल.

<><><><><>

कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, दक्षिण कर्नाटक, तामिळनाडू, पुडुचेरी, दक्षिण आंध्रप्रदेश, रायलसीमा, आणि केरळमध्ये आज काही ठिकाणी जोरदार, तर तुरळक ठिकाणी अती जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

पश्चिम मध्य बंगालचा उपसागर, तामिळनाडू, पुडुचेरी आणि दक्षिण आंध्रप्रदेशच्या किनारपट्टी जवळच्या खोल समुद्रात आज दुपारपर्यंत वादळी स्थिती राहणार असून, मच्छिमारांनी या भागातून परत यावं, असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.